PDF Compressor Free Version

Maharashtra
ECOTOURISM

# महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ

10/2, स्टार्की टाऊन, मंगळवारी बाजार, सदर, नागपूर 440 001
दुरध्वनी क्रमांक 0712-2978844
E-mail ID : mahaecotourism@mahaforest.gov.in

**विषय:** महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक 29/07/2021 रोजी आयोजित 13 व्या सभेच्या कार्यवृत्तांता बाबत.
**क्रमांक:** व्यसं/मनिपविमं-सभा/प्र.क्र.121/21-22/230
**नागपूर:** 440 001. **दिनांक :** 12 /08/2021

प्रति,

1. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
2. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
3. व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लि. नागपूर तथा सदस्य कार्यकारी समिती किंवा त्यांचे प्रतिनिधी.
4. प्रधान मुख्य वनसंरक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी (महाकॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
5. प्रधान मुख्यवनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
6. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर तथा सदस्य सचिव कार्यकारी समिती.
7. अपर प्रधान मुख्यवनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समिती.
8. अपर प्रधान मुख्यवनसंरक्षक (वन्यजीव), पुर्व नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
9. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समिती किंवा त्यांचे प्रतिनिधी.
10. मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती तथा सदस्य कार्यकारी समिती.
11. डॉ. विजय लक्ष्मणराव घुगे, संस्थापक, अध्यक्ष, निसर्ग विज्ञान मंडळ, नागपूर, सदस्य कार्यकारी समिती.
12. डॉउज्वला.शिरीष चक्रदेव.B.Arch.M.Tech. Ph.D.Principal.W.E.S.s Smt. Mnoramabai Mundle College of Architecture,Nagpur सदस्य कार्यकारी समिती.
13. श्री.प्रफुल्ल मधुसुदन भांबुरकर.Co-ordinator & Project Advisor, Wildlife Trust of India. Nagpur सदस्य कार्यकारी समिती.
14. श्रीहर्षवर्ध.न धनवटे ,घोसरी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाजवळ ,टायग्रेस ॲट घोसरी व्हीलेज , भद्रावती, चंद्रपूर सदस्य कार्यकारी समिती.
15. उप-महाप्रबंधक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर

PDF Compressor Free Version

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची 13 वी सभा, मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 29/07/2021 रोजी दुपारी 3.30 वाजता "कंट्रोल कमांड रुम", वनभवन, नागपूर येथे संपन्न झाली. सदर सभेचा कार्यवृत्तांत सोबत माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

**सहपत्र:- वरील प्रमाणे.**

सदस्य-सचिव, कार्यकारी समिती तथा
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर

**प्रतिलिपी**:-प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -400 032 यांना वरीलप्रमाणे सहपत्रांसह माहितीस्तव सादर.

**प्रतिलीपी**:-अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मीक), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना वरील प्रमाणे सहपत्रासह सस्नेह अग्रेषीत.

**प्रतिलिपी**:-मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व यांना वरील प्रमाणे सहपत्रांसह योग्य त्या कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.

**प्रतिलिपी**:-वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे यांना वरील प्रमाणे सहपत्रांसह योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.

**प्रतिलिपी**:-विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) कोल्हापूर यांना वरील प्रमाणे सहपत्रांसह योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.

**प्रतिलिपी**:-उप विभागीय वन अधिकारी वन अधिकारी, मालेगांव, नाशीक वनवृत्त यांना वरील प्रमाणे सहपत्रांसह योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.

सदस्य-सचिव, कार्यकारी समिती तथा
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर

प्रत – कक्ष-2, योजना, मनिपविमं यांना सहपत्रांसह माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.

PDF Compressor Free Version

**महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या दिनांक २९/०७/२०२१ रोजी संपन्न झालेल्या कार्यकारी समितीच्या सभेचा कार्यवृत्तांत**

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची १३ वी सभा दिनांक २९ जुलै, २०२१ रोजी दुपारी ३.३० वाजता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांचे अध्यक्षतेखाली **"कमांड कंट्रोल रुम "** वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे संपन्न झाली. सभेत उपस्थित कार्यकारी समिती सदस्यांची यादी ***(परिशिष्ट-१)*** नुसार सोबत जोडली आहे.

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ तथा सदस्य-सचिव यांनी ***तेराव्या सभेच्या*** सुरुवातीस अध्यक्षांचे व उपस्थित सर्व सदस्यांचे व इतर अधिकाऱ्यांचे स्वागत केले व त्यानंतर अध्यक्षांचे परवानगीने विषयसुचीनुसार सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

सभेमध्ये सर्व विषयावर सविस्तर चर्चा होऊन कार्यकारी समिती व्दारे खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ.क्र. | विषय | समितीचे निर्णय |
|---|---|---|
| **विषय क्रमांक १** | | |
| १. | दिनांक ०९/०३/२०२१ रोजी झालेल्या १२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करणे बाबत. | कार्यवृत्तांतावर कोणत्याही सदस्याकडून कोणत्याही विषयावर आक्षेप किंवा सुधारणाबाबत सूचना प्राप्त झालेल्या नाहीत. सदर कार्यवृत्तांत कायम करण्यास समितीने मान्यता दिली. |
| **विषय क्रमांक २** | | |
| 2. | सन २०२०-२१ मध्ये निसर्ग पर्यटन योजने अंतर्गत प्राप्त अनुदान व खर्चाचा अहवाल. | सदर अहवालास कार्यकारी समिती व्दारे मान्यता देण्यात आली. |
| **विषय क्रमांक ३** | | |
| 3. | सन २०२१-२२ वार्षिक आराखड्यांना मान्यता देणेबाबत. | सदर प्रस्तावास कार्यकारी समिती व्दारे मान्यता देण्यात आली. |
| **विषय क्रमांक ४** | | |
| 4. | निसर्ग पर्यटन स्थळाचे वर्गवारी करीताचे निकषांना मान्यता देणेबाबत. | सभेमध्ये सुचविल्यानुसार आवश्यक खालील प्रमाणे सुधारणांसह निकषांना कार्यकारी समिती व्दारे मान्यता देण्यात आली. |

| अ.क्र. | तपशील | निकष | जिल्हास्तरीय | राज्यस्तरीय/ राष्ट्रस्तरीय |
|---|---|---|---|---|
| १ | पर्यटनस्थळाची व्याप्ती (Tourist Potential) | पर्यटन स्थळाचे महत्त्व, पोहोच मार्गाची सुलभता; पर्यटकांकरीता सोई सुविधांची उपलब्धता; पर्यटन सर्कीटमध्ये समावेश असणे | केवळ जिल्ह्यापुरती मर्यादीत असणे | महत्त्वाची निसर्ग पर्यटन स्थळे, व्याघ्र प्रकल्प. |

PDF Compressor Free Version

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २ | भेट देणाऱ्या पर्यटकांची व्याप्ती (Tourist Footfall) | - | स्थानिक/ जिल्ह्यातील पर्यटकांपुरते मर्यादीत केवळ विशिष्ट कालावधीमध्ये येणारे पर्यटक | राज्यातील/देशातील पर्यटकांकरीता आकर्षण केंद्र, वर्षभर नियमीत पणे पर्यटकांची भेट क्षेत्रे |
| ३ | पर्यटकांकरीता उपलब्ध उपक्रम (Activities Available for Tourist) | उदा. वन्यजीव सफारी साहसी खेळ, पक्षी निरीक्षण, निसर्ग भ्रमण ई. | मर्यादीत | पर्यटकांकरीता विविध उपक्रमांची उपलब्धता |

**विषय क्रमांक ५**
**निसर्ग पर्यटन विकास आराखड्यांना मान्यता देणेबाबत**

| | | |
|---|---|---|
| ५.१ | मालेगांव तालुक्यातील गाळणा ऐतिहासिक किल्ला पर्यटन विकास आराखडा मंजुरी बाबत. | १) गाळणा किल्ला पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत असल्याने त्यांच्या पूर्व परवानगी शिवाय आराखड्यातील प्रस्तावित कामांना मान्यता देणे योग्य नाही. तरी पुरातत्व विभागाची परवानगी प्राप्त करावी.<br>२) सदर आराखड्यामध्ये प्रस्तावित चेनलींग फेंसींगची कामे वगळण्यात यावी.<br>३) आराखड्यामध्ये प्रस्तावित कामांना वन संवर्धन अधिनियम १९८० मधील तरतुदी आकृष्ट होतात किंवा कसे हे स्पष्ट करावे.<br>४) सदर पर्यटन स्थळाला भेट देण्याकरीता येणाऱ्या पर्यटकांची संख्या, मुक्कामाकरीता अपेक्षीत पर्यटकांची संख्या व त्या अनुषंगाने पर्यटकांच्या मुक्कामा करीता प्रस्तावित सोयी सुविधा याची आवश्यकता स्पष्ट करण्यात यावी<br>५) सदर पर्यटन स्थळ कशाप्रकारे स्वयंचलीत होणार आहे हे स्पष्ट करण्यात यावे.<br>वर नमुद सर्व बाबींचे स्पष्टीकरणासह सुधारीत आराखडा सादर करण्याच्या सुचना देण्यात आल्या. |
| ५.२ | राधानगरी अभयारण्य पर्यटन विकास आराखडा मंजुरी बाबत. | १) सद्यस्थितीत पर्यटक संख्येच्या तुलनेत प्रस्तावित सोई सुविधांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येते. प्रस्तावित आराखड्यामध्ये सदर पर्यटन स्थळाच्या वहन क्षमतेच्या मर्यादेत पर्यटक सोयी सुविधा प्रस्तावित कराव्या.<br>२) दिनांक १७/११/२०१८ चे कार्यकारी समितीचे सभेत दिलेल्या सुचनेनुसार आराखड्यातील स्थापत्य कामे (Civil Works) एकूण आराखड्याच्या रक्कमेच्या ४०% पेक्षा जास्त नसावीत.<br>३) राज्य निसर्ग पर्यटन धोरणामध्ये नमुद केल्यानुसार पर्यटन स्थळावरील निसर्गाचे संवर्धनास प्रथम प्राधान्य आहे.<br>४) सर्व विकासकामांकरीता शक्यतोवर नैसर्गिक संसाधनचा वापर करण्यात यावा. वरील बाबी लक्षात घेऊन सुधारीत आराखडा सादर करण्यात यावा. |
| ५.३ | देऊळगांव-रेहकुरी काळविट अभयारण्य पर्यटन विकास आराखडा मंजुरी बाबत. | १) सर्व विकासकामांकरीता शक्यतोवर नैसर्गिक संसाधनचा वापर करण्यात यावा.<br>२) आराखड्यामध्ये प्रस्तावित बाब क्रमांक १,२,२३,३०,३१ व |

PDF Compressor Free Version

| | | |
|---|---|---|
| | | ३२ मध्ये नमूद रोपवन व विविध वन उद्यानाची कामे वगळून उर्वरीत आराखड्यास वनसंवर्धन अधिनियम-१९८० मधील तरतुदींचा भंग होणार नाही या अटीवर मान्यता देण्यात आली. |
| ५.४ | मौजे भांडेवाडी ता.कर्जत जि.अहमदनगर येथील ग.न. ४१६ वनक्षेत्रावर वन पर्यटन आराखड्यांना मंजुरी मिळणेबाबत. | सदर निसर्ग पर्यटन स्थळ विकासा करिता स्वर्गीय उत्तमराव पाटील जैव विविधता उद्यान या योजने अंतर्गत किंवा जिल्हा योजना व विकास समिती यांचे कडुन निधी प्राप्त करुन घेण्याच्या तसेच सदर स्थळावरील नैसर्गिक झाडोरा अबाधित ठेवणेच्या अटीवर मान्यता देण्यात येत आहे. |
| ५.५ | अकोला परिक्षेत्रातील कुटासा या परिसरामध्ये ईको-टुरीझम कार्यक्रम राबविण्याबाब. | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती यांचे दिनांक २८/०७/२०२१ चे पत्रात नमूद केल्यानुसार "अकोला वन विभागाची कार्यआयोजना मंजुरी नंतर वन खंड क्रमांक ३८९ मध्ये कुंपन करुन कुरण विकास व बांबु रोपवन कामे प्रायोगीक तत्वावर घेऊन त्याचे यशस्वीतेनंतर सदर क्षेत्र निसर्ग पर्यटन विकासाचे दृष्टीने विकसित करणे योग्य राहील" असे नमूद आहे. त्यामुळे सदर आराखडा अमान्य करण्यात येत आहे.<br>वन संरक्षणाच्या दृष्टीने सदर क्षेत्राला कुंपन करणे आवश्यक असल्यास वन संरक्षण शिर्षाअंतर्गत स्वतंत्ररीत्या प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे आवश्यक तो प्रस्ताव सादर करण्यात यावा. |

सभेच्या शेवटी व्यवस्थापकीय संचालक, निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांनी उपस्थितांचे आभार मानून अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सदस्य-सचिव, कार्यकारी समिती व
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर

**कार्यवृतांत प्र.मु.व.सं. (ववप्र) तथा**
**अध्यक्ष,का.स., मनिपविमं यांचेद्वारा मंजूर.**

PDF Compressor Free Version

परिशिष्ट - १

# दिनांक २९ जुलै २०२१ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या १३ व्या सभेमध्ये उपस्थितांची यादी

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | समितीमधील पद | पदनाम |
|---|---|---|---|
| १ | श्री.जी.साईप्रकाश | अध्यक्ष | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| २ | श्री.प्रदीप कुमार | सदस्य | प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर अति. कार्यभार |
| ३ | श्री.एस.जी.टेंभुर्णीकर | सदस्य | प्रधान मुख्य वनसंरक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी, (महाकॅम्पा) महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| ४ | श्री.सुनील लिमये | सदस्य | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| ५ | श्री.विकास गुप्ता | सदस्य सचिव | व्यवस्थापकीय संचालक, मनिपविमं, नागपूर तथा सदस्य सचिव, कार्यकारी समिती,मनिपविमं, नागपूर |
| ६ | श्री. व्ही.आर. तिवारी | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समिती, मनिपविमं, नागपूर |
| ७ | श्रीमती जयोती बॅनर्जी | सदस्य | मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती |
| ८ | डॉ. विजय लक्ष्मणराव घुगे | सदस्य | संस्थापक, निसर्ग विज्ञान, मंडळ, नागपूर |
| ९ | डॉ.उज्वला चक्रदेव | सदस्य | Principal WESS Smt.Manorambai Mundle College of Architicutre, Nagpur |
| १० | श्री.प्रफुल एस भांबुरकर | सदस्य | Co ordinator & Project Advisor Wildlife Trust of India, Nagpur |
| ११ | श्री.हर्षवर्धन धनवटे | सदस्य | टायग्रेस अँट बोसरी व्हॉलेज, बोसरी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाजवळ, भद्रावती चंद्रपूर |
| १२ | श्रीमती. क्षिप्रा बोरा | सदस्य | एम. टी. डी. सी. रीजनल हेड, नागपूर डिव्हीजन |
| १३ | श्री. नितीन गुदगे | | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नाशिक |
| १४ | श्री.रमेश कुमार | | वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे |
| १५ | सौ.सुवर्णा माने | | उपवनसंरक्षक, अहमदनगर |
| १६ | श्री.व्ही.एन.माळी | | विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), कोल्हापूर |
| १७ | श्री.जे.एन.येडलावार | | उप विभागीय वन अधिकारी, मालेगांव नाशिक |
| १८ | श्रीमती. श्रीलक्ष्मी | | उपमहा प्रबंधक, मनिपविमं, नागपूर अति. कार्यभार |
| १९ | श्रीमती. एस.व्ही.सरोदे | | वनपरिक्षेत्र अधिकारी, निसर्ग पर्यटन, एफडीसीएम, लि.नागपूर. |